## <u>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**
**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :६४/२०२२/धुळे**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री.राहुल चंद्रकांत भारती,<br>रा. रिमझिम बंगला,<br>मयूर शाळेजवळ,<br>देवपूर, जि. धुळे | उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद कार्यालय,<br>धुळे, ता.जि.धुळे |

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**<u>सुनावणी दिनांक ३०/०१/२०२४</u>**

तक्रारदार यांनी दिनांक ०२/०३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ३०/०१/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक ०२/०३/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार माहिती उपलब्ध करुन दिली नाही व आयोगाच्या आदेशाचे पालन केलेले नाही.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक.२२२७/२०१९/धुळे संदर्भात दिनांक ०५/०२/२०२१ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ८ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १०/१०/२०१६ रोजीच्या माहिती तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, धुळे, श्री. एम.जे.सोनवणी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३/०६/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी."

४) सुनावणीपूर्वी प्रस्तुतच्या तक्रार अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून मागविण्यात आलेला अहवाल अद्यापही आयोगास प्राप्त झालेला नाही. तसेच सुनावणीसाठी देखील संबंधित जन माहिती अधिकारी अनुपस्थित असुन तक्रारीची वस्तुस्थिती आयोगाच्या निदर्शनास आलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, धुळे, यांनी द्वितीय अपील क्रमांक.२२२७/२०१९/धुळे मध्ये आयोगाने दिनांक ०५/०२/२०२१ रोजी पारीत केलेल्या आदेशाचे तातडीने अनुपालन करावे.

२) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक.२२२७/२०१९/धुळे संदर्भात दिनाक ०५/०२/२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशाचे जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, धुळे, श्री. एम.जे.सोनवणे यांनी पालन केले नाही. म्हणुन त्यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत तक्रार क्रमांक ६४/२०२२/धुळे निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रत – माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी

शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद परिषद कार्यालय, धुळे,ता.जि.धुळे

यांना कळविण्यात येते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशाची प्रत संबंधितांना बजावून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन योग्य त्या सूचना द्याव्यात.

---

जा.क्रं.आो-४९० 1 5 MAR 2024